अतारांकित प्रश्नोत्तरांची ऐकोणसत्तरावी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचा (मेडिकल) विजेवर होणारा कोटयवधीच्या खर्चावर आळा घालण्याबाबत**

**(१) ९६ (२०-०३-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचा (मेडिकल) विजेच्या वापरापोटी दरवर्षी कोटयवधी रुपये खर्च होत असून नळ आणि विजेचे बिल भरण्यात दरवर्षीचा पीएलए फंड खर्च होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेडिकलच्या टीबी वॉर्ड परिसरात दोन वर्षापूर्वी सनब्लेस सौरऊर्जा पार्कच्या प्रस्तावाला मान्यता दिली परंतु वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाने हा प्रकल्प पुन्हा बंद केला असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दरवर्षी विजेवर होणारा कोटयवधीच्या खर्चावर आळा घालण्याबाबत शासनस्तरावरुन काय कार्यवाही वा उपायोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१०-११-२०२१) :** (१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर या संस्थेच्या नळ व वीजेचे बिले शासन मंजूर अनुदानातून ०६ दूरध्वनी वीज, पाणी या उद्दिष्टामधून खर्च भागविण्यात येतो. दूरध्वनी, वीज व पाणी ०६ या उद्दिष्टामध्ये बी.डी.एस. प्रणालीवर अनुदान उपलब्ध नसले तरी वजा तरतुदीवर देयके पारीत होतात. त्यामुळे संस्थेच्या रुग्णालयीन स्विय प्रपंची खात्यातून रक्कम खर्च करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालयातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना ठरलेले किमान वेतन नियमित देण्याबाबत**

**(२) ९८७ (२२-०३-२०२०). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालय येथे कार्यरत ४५० कंत्राटी कर्मचाऱ्यांना ठरलेले किमान वेतन नियमित मिळत नसल्याने जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे दिनांक ३१ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी चुकीच्या निविदेला पात्र ठरविल्याने कंत्राटी व कर्मचाऱ्यांना किमान वेतनापासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप कामगाराकडून दिलेल्या निवेदनात केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालय येथे कार्यरत कंत्राटी व कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांचे विरोधात यापूर्वी एक दिवसीय कामबंद आंदोलन करून निषेध नोंदविला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालय कार्यरत कंत्राटी व कर्मचाऱ्यांना किमान वेतन नियमित मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२०-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर संस्थेमध्ये ५०१ कंत्राटी कर्मचारी बाह्यस्त्रोतामार्फत घेण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर कंत्राटी कर्मचा-यांचे प्रलंबित असलेले वेतन अदा करण्याच्या अनुषंगाने माहे ऑगस्ट २०२१ मध्ये देयके कोषागार कार्यालयास सादर करण्याअत आली असता, कोषागार कार्यालयास सादर करण्यात आली असता, कोषागार कार्यालयाने आक्षेप उपस्थित केली आहेत. सदार आक्षेपांची पूर्तता कराण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माटुंगा (मुंबई) येथील दयानंद बालक-बालिका विद्यालयाविरुध्द कारवाई करण्याबाबत**

**(३) १०६१ (०८-०४-२०२०). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माटुंगा येथील दयानंद बालक-बालिका विद्यालयात सुधारित नागरीकत्व कायद्याच्या समर्थनार्थ विद्यार्थ्यांकडून पोस्टकार्ड लिहून घेतल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन राजकीय कार्यक्रम करणाऱ्या या शाळेच्या व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२५-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना वेतन देण्याबाबत**

**(४) १५०१ (०८-०४-२०२०). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.फारूक शाह (धुळे शहर), श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना शासनाच्या दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये १४६ व दिनांक १३ सप्टेंबर २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये १६३८ उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालये २० टक्के शासन अनुदानास पात्र म्हणून घोषित करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने घोषित केल्यानुसार अनुदानास पात्र ठरलेल्या सदर उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना त्यानुसार अनुदान वाटप करणे अपेक्षित असताना अद्याप अनुदान वाटप करण्यात आले नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन अनुदानास पात्र ठरलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांना अद्याप अनुदान वाटप न करण्याची कारणे काय आहेत, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२५-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) अशंत: खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दि. १३ सप्टेंबर, २०१९ अन्वये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित केले आहे. या शासन निर्णयातील काही अटी जाचक असल्यामुळे या अटी रद्द कराव्यात, अशी विनंती विविध संघटना व शिक्षक प्रतिनिधी यांनी शासनास केली होती. यानुषंगाने मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली त्रुटी समिती गठित करण्यात आली व या समितीने केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, दि. १३ सप्टेंबर, २०१९ मधील काही अटी व शर्तीमध्ये शासन निर्णय दि. ४ डिसेंबर, २०२० अन्वये सुधारणा करण्यात आली.

त्यानुसार, शालेय शिक्षण विभागाकडून पात्र शाळांच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात येऊन, तपासणीत पात्र ठरलेल्या शाळांना दि.१२ फेब्रुवारी, २०२१ व दि.१५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये खाजगी प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदानास पात्र घोषित करुन, दि. १ नोव्हेंबर, २०२० पासून सरसकट २० टक्के / वाढीव २० टक्के अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यानुसार शासन निर्णय, दि.१७ मार्च, २०२१ अन्वये वेतन

अनुदानासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच, शासन निर्णय, दि. २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये २० टक्के अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आलेल्या मुंबई व कोल्हापूर विभागातील कनिष्ठ महाविद्यालयांना, शासन निर्णय, दि. १८ ऑगस्ट, २०२१ अन्वये वेतन अनुदानासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

---

## गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठामधील पदभरतीमध्ये निवड यादी जाहीर न करता नियुक्ती आदेश दिल्याबाबत

**(५) १६४६ (२३-०४-२०२०). अॅड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठात माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये विविध पदांच्या भरतीसाठी प्रकाशित केलेल्या जाहिरातीची लेखी परीक्षा मराठी राजभाषेच्या नियमाचे उल्लघन करुन इंग्रजी भाषेतुन घेतली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजभाषा मराठी असूनही परीक्षा इंग्रजी भाषेतुन घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, लेखी परीक्षा व मुलाखतीतून पात्र उमेदवारांची यादी जाहीर न करता नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२-११-२०२१) :** (१) हे अशंत: खरे आहे.

वर्ग अ व ब मधील पदांकरीता इंग्रजी माध्यमातून तसेच वर्ग क व ड पदांकरीता मराठी माध्यमातून परीक्षेचे आयोजन केले होते.

(२) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दि.२३.०८.२०१९ रोजी वर्ग अ व ब मधील पदांकरीता इंग्रजी माध्यमातून परीक्षा घ्यावी व वर्ग क व ड पदांकरीता मराठी माध्यमातून परीक्षा घ्यावी, असा ठराव पारित केला असून त्यानुसार पदभरतीची प्रक्रीया विद्यापीठाने राबविलेली आहे.

(३) जाहिरात क्र.२७/२०१८ नुसार लेखी व संगणकीय चाचणी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती विद्यापीठ निर्देश क्र.१९ व २०/२०१९ नुसार दि.२१.१२.२०१९ व दि.२३.१२.२०१९ रोजी पार पडलेल्या आहेत. त्यानुसार निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांचे नियुक्तीचे आदेश दि.२४.१२.२०१९ रोजी निर्गमित केलेले आहेत. तथापि, विद्यापीठाच्या दि.२४.१२.२०१९ च्या आदेशान्वये सर्व प्रशासकीय विभागांना प्रतिपुरक रजा मंजूर करण्यात आली असल्याने निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी दि.३०.१२.२०१९ रोजी विद्यापीठाने विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर, यावल (जि. जळगांव) या तालुक्यांतील केळीला फळाचा दर्जा देण्याबाबत**

**(६) १७९९ (०९-०४-२०२०). श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर, यावल (जि. जळगांव) या तालुक्यांतील केळीला फळाचा दर्जा मिळण्याबाबत शेतकऱ्यांनी व लोकप्रतिनिधींनी विविध निवेदनाद्वारे मागणी केली असल्याचे दिनांक १० जानेवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार उक्त मागणीनुसार शासनाने केळीला फळाचा दर्जा देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (२२-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केळी पिकाचा फळपिकामध्ये समावेश गृहित धरुनच केंद्र व राज्य शासनाच्या योजनांमधुन अर्थसहाय्य दिले जात आहे. तथापि, केळीला फळाचा दर्जा देण्यासंदर्भात योग्य ते आदेश व मार्गदर्शन मिळणेसंदर्भात केंद्रिय कृषि मंत्रालयाकडे व राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, त्रिची (तामिळनाडू) यांच्याकडे दि. २६.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहराचा पर्यटनदृष्टया विकास करण्याबाबत**

**(७) ५०९३ (०७-०४-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूरला ऐतिहासिक महत्त्व आहे भौगोलिक दृष्ट्या उत्तम असे ठिकाण असून परिसरातील तीर्थक्षेत्रांचा विकास करताना इतर उपलब्ध पर्यटनस्थळांचा विकास झाला नसल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिद्धेश्वर मंदिराचे सुशोभीकरण, म्युझिकल फाऊंटन, नौकाविहार, भुईकोट किल्ला, डॉक्टर कोटणीस गार्डन, पार्क स्टेडियमचा, संभाजी तलाव सुशोभीकरण व इतर सर्व पर्यटनाचे ब्रँडिंग केल्यास सोलापूर शहराचा विकास करणे शक्य होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर शहराचा पर्यटनदृष्टीने विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२८-१०-२०२१) :** (१) नाही.

(२) होय.

(३) सोलापूर शहरातील संभाजी तलावाचे सुशोभिकरण करणे या कामासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०१७-१८ अंतर्गत रु.४९३.८२ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन रु.५०.०० लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच सदर तलावाच्या संवर्धन व सुशोभिकरणाच्या कामासाठी केंद्र शासनाच्या 'राष्ट्रीय सरोवर संवर्धन व सुशोभिकरण' योजनेतून रु.१३.१८ कोटी रकमेस मंजुरी प्राप्त झाली आहे.

स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत भुईकोट किल्ला परिसरातील हुतात्मा बाग सुधारणेचे रु.१.६४ कोटी खर्चाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच सिध्देश्वर तलाव परिसर सुशोभिकरण करणे आणि तलाव सुधारणा करणे ही अनुक्रमे रु.१३.८३ कोटी व रु.२.९१ कोटीची कामे प्रगतीपथावर आहेत.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१३-१४ अंतर्गत डॉ. व्दारकानाथ कोटणीस उद्यान येथे पाथ-वे, पेव्हर ब्लॉक बसविणे, उद्यान बंदिस्त करणे, बोअर वेल, लॉन, एल.ई.डी.लाईट बसविलेले कारंजे बांधणे, शोभिवंत झाडे लावणे इ. कामे करण्यात आली आहेत. तसेच स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत इंदिरा गांधी स्टेडियमचे नुतनीकरण व पुनर्विकास करणे (टप्पा-१) या रु.७.६५ कोटीच्या कामास डिसेंबर, २०१९ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात प्राचार्यांना प्राध्यापकांच्या समकक्ष वेतन निश्चिती करणेबाबत.**

**(८) ५२७८ (२३-०४-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयांमधील प्राचार्य महासंघाने प्राचार्याचे किमान वेतन रू.४३०००/- विहित करण्याची मागणी याचिका क्र. ६३४/२०१६ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई याचिकेच्या नुसार मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०६ सप्टेंबर, २०१९ रोजी आदेश पारित करून याचिकाकर्ते यांची मागणी मान्य केल्याने संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडून दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडून दिनांक २४ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झालेल्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात मा. मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन दि.०५.०५.२०२१ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठाच्या कालिना कॅम्पसमधील परिक्षा विभागात तिसऱ्या मजल्यावरील स्लॅबचा काही भाग कोसळल्याबाबत**

**(९) ५५६२ (०७-०४-२०२०). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कालिना कॅम्पसमधील परिक्षा विभागात तिसऱ्या मजल्यावरील स्लॅबचा काही भाग कोसळल्याची घटना दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (३०-१०-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
परीक्षा विभागात तिसऱ्या मजल्यावरील खोली क्र.६० मध्ये स्लॅबच्या प्लॅस्टरचा काही लूज भाग आभासी छतावर पडून, आभासी छताचा काही भाग जमिनीवर पडला. सद्यस्थितीत इमारतीतील स्लॅबच्या लूज प्लास्टरची तपासणीचे काम पुर्ण झाले असून, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्याबाबत विद्यापीठामार्फत काळजी घेण्यात येत आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील सर्व महाविद्यालयांच्या नावाचे फलक मराठी भाषेत लावण्याबाबत**

**(१०) ६११५ (०७-०४-२०२०). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व महाविद्यालयांच्या नावाचे फलक मराठी भाषेत लावण्याचे आदेश उच्च व तंत्र शिक्षण, मंत्री यांनी निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदेशाच्या अनुषंगाने मराठीतून नाम फलक लावले आले नसल्यास महाविद्यालयांची मान्यता रद्द केली जाईल असा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठी भाषेतून विद्यालयाच्या नावाचे फलक न लावणा-या किती महाविद्यालयांवर आतापर्यंत कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२-१-२०२१) :** (१) होय,
राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयामध्ये लावण्यात येणारे नाम फलक मराठी भाषेतून लावण्याबाबत शासनाच्या दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० च्या परिपत्रकान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(२) नाही.
(३) दिनांक १५ फेब्रुवारी २०२० च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे शैक्षणिक संस्थांकडून पालन करण्यात येते किंवा नाही याची वैयक्तिक लक्ष देऊन खात्री करण्याचे निर्देश संस्थेच्या प्राचार्य / सहसंचालक, उच्च शिक्षण / तंत्र शिक्षण यांना देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्र्न उद्भवत नाही.

---

**शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील रस्त्याच्या कडेला उग्र वासाचे रसायन टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(११) ६५२५ (०७-०४-२०२०). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील रस्त्याच्या कडेला उग्र दर्प येत असलेले घातक रसायन टाकल्यामुळे त्याचा दर्प गावात पसरत असल्याने नागरिकांना डोकेदुखीचा तसेच श्वसनाचा त्रास होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०२-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) या प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून शहापूर-शेणवा मार्गाची पाहणी केली असता मौजे शेलवली व मौजे मळेगाव येथे रस्त्यालगत रासायनिक सदृश्य द्रव्य टाकल्याचे निर्दशनास आले होते.
भविष्यात अशा घटना घडू नये याकरिता सदर परिसरात गस्त वाढवून दक्षता घेण्याबाबत स्थानिक पोलिस ठाण्यांना सूचित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनांच्या विविध मागण्यांबाबत**

**(१२) ६७५९ (१०-०४-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचा-यांकरीता १२ व २४ वर्षाची कालबध्द व आश्वासित प्रगती योजना पुर्ववत सुरु करणे, अशासकीय अनुदानीत महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाची पूर्ण अंमलबजावणी करणे, अंशदायी पेन्शन योजना रद्द करुन पून्हा जुनी पेन्शन योजना सुरु करण्यात यावी इत्यादी अनेक मागण्यांबाबत वारंवार शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे चंद्रपूर/गडचिरोली अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनांनी मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (११-११-२०२१) :** (१) (२) व (३) राज्यातील महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचा-यांना १२ व २४ वर्षाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पूर्ववत सुरू करण्याबाबतची निवेदने महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी संघटनांकडून प्राप्त होत असतात. तदनुषंगाने नमूद करण्यात येते की, शासन निर्णय दि.२८.१२.२०१० व दि.१५.०२.२०११ अन्वये अनुक्रमे वित्त विभागाच्या दि.०५.०७.२०१० व दि.०१.०४.२०१० च्या शासन निर्णयातील तरतुदी अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना विभाग स्तरावरून जशाच्या तशा लागू करून त्याप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात आले. सदरहू योजना अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचा-यांना लागू करण्यामुळे शासनावर वित्तीय भार येत असल्याने उक्त शासन निर्णयास वित्त विभागाची मान्यता घेणे अपेक्षित होते. तथापि, उपरोक्त दि.२८.१२.२०१० व दि.१५.०२.२०११ निर्गमित करताना वित्त विभागाची मान्यता घेण्यात आली नसल्याचे निदर्शनास आल्यावर वित्त विभागाने दिलेल्या निर्देशानुसार उक्त दोन्ही शासन निर्णय अनुक्रमे दि.१६.०२.२०१९ व दि.०७.१२.२०१८ अन्वये पूर्वलक्षी

प्रभावाने रद्द करण्यात आलेले आहेत. शासन निर्णय दिनांक ०७.१२.२०१८ व दि.१६.०२.२०१९ विरोधात मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठापुढे याचिका दाखल झालेल्या असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

राज्यातील अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची सुधारित वेतनश्रेणी शासन अधिसूचना दि.०७.०९.२०१९ अन्वये लागू करण्यात आली आहे. तसेच राज्य शासनाने दि.०१.११.२००५ रोजी वा त्यानंतर सेवेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबतचा धोरणात्मक निर्णय घेतलेला असल्याने जुनी पेंशन योजना लागू करण्याबाबतचा कोणताही निर्णय विभागाच्या विचाराधीन नाही.

---

**धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) एम.आय.डी.सी. मधील रासायनिक कंपन्यांतील प्रदुषित वायू व सांडपाण्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्यावर झालेला दुष्परिणाम**

**(१३) ९९४६ (२९-०५-२०२०). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाटाव (ता.रोहा, जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीतील काही रासायनिक कंपन्यांमधून होणाऱ्या वायू प्रदुषणामुळे मौजे- उडदवणे, रोठ (खु) व रोठ (बु) या गावांमध्ये कायम धुके सदृष्य स्थिती निर्माण झाली असून रासायनिक प्रक्रियेनंतर सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे कुंडलिका व लगतची गंगा नदी प्रदुषित होवून शेती पिकांवर व नागरिकांच्या आरोग्यावर दुष्पपरिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सबंधित कंपन्यांना शासनाकडून नोटीस देवूनही तसेच यांचेविरूध्द ग्रामस्थांनी अनेकदा तक्रार करुनही कंपन्यांवर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार परिसरातील शेती व नागरिकांचे आरोग्य् सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०१-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) गंगा नदी प्रदूषणाबाबतच्या स्थानिक वर्तमानपत्रातील बातमीच्या आधारे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून धाटाव औद्योगिक वसाहतीची पाहणी करण्यात आली. पाहणीवेळी दोषी आढळलेल्या मे. धरमसी मोरारजी केमिकल कं.लि. या उद्योगास रू. २ लक्ष इतकी बँक हमी देण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे, नदीपात्रात कोणत्याही प्रकारचा विसर्ग होऊ नये याकरिता नदीपात्राजवळील ८ उद्योगांना व नदी काठावरील ग्रामपंचायतींना दि. २८.०१.२०२० रोजी प्रस्तावित निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**ग्रंथालय संचालनालयाने केलेली कर्मचाऱ्यांची नियुक्ती**

**(१४) ११५९१ (१४-०९-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रंथालय संचालनालयाने प्रकल्पग्रस्त या सदराखाली सन १९९९-२००० या कालावधीमध्ये शासनाची पूर्व परवानगी न घेता व नियमाचे उल्लंघन करुन करण्यात आलेल्या ३० कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीमध्ये लाखो रूपयांचा गैरव्यवहार झाल्या प्रकरणाची चौकशी करून जा.क. १५/२०१३-१४/२४-९८ दिनांक २९ जानेवारी, २०१४ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील ३० प्रकल्पग्रस्त कर्मचा-यांना बडतर्फ केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तदनंतर प्रकल्पग्रस्त कर्मचारी शासकीय न्यायाधिकरण (मॅट) न्यायालयामध्ये गेले असता उक्त कर्मचारी हे अवैध प्रकल्पग्रस्त असल्याबाबत शासनाच्या वतीने बाजू न मांडल्याने सदरील अवैध प्रकल्पग्रस्त कर्मचाऱ्यांना शासकीय न्यायाधिकरण न्यायालयाने पुन्हा कामावर घेण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील कर्मचारी अवैध प्रकल्पग्रस्त असल्याबाबत शासकीय न्यायाधिकारण न्यायालयात बाजू न मांडण्याची व याप्रकरणी आपील दाखल न करण्याची कारणे काय आहेत, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून दोषी असलेल्या संबधित ग्रंथालय संचालनालयातील तत्कालिन तत्सम अधिकारी व त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकारी यांच्यावर कारवाई करून उपरोक्त ३० अवैध प्रकल्पग्रस्तानां बडतर्फ करण्याची मागणी लोकप्रतिनिधिंनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ०९ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे वा याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-१०-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) याप्रकरणी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये शासनाच्या वतीने पूर्णपणे बाजू मांडण्यात आली आहे. याबाबत न्यायाधिकरणाने या सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवा पूर्ववत व कायम ठेवण्याबाबत व त्यांच्या सेवेत विहित नियमातील कार्यपद्धती शिवाय कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करु नये असे आदेश दिले. या आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालयात अपिल दाखल दाखल न करण्याबाबतचा निर्णय हा विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार घेण्यात आला आहे.

सदर नियुक्त्यासंदर्भात तत्कालिन ग्रंथालय संचालक, श्री. मो.भु.मेश्राम यांच्या सेवानिवृती वेतनात कायमस्वरुपी १० टक्के व तत्कालिन अधिक्षक, श्री. वा. ना. भालेराव यांच्या सेवानिवृती वेतनात कायमस्वरुपी ५ टक्के कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रकल्पग्रस्त कर्मचा-यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याची कार्यवाही संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्हयातील मजूर ताळेबंदी कालावधीत बेरोजगार झाल्याने त्यांना विशेष आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(१५) ११८६१ (११-०९-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील शेतमजूर, वनमजूर, बांधकाम मजूर व लहान व्यवसायीकांचे सर्व व्यवहार शासनाने जाहीर केलेल्या टाळेबंदीच्या काळात बंद असल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्हा अतिदुर्गम व आदिवासी बहूल तथा जंगलाने व्याप्त जिल्हा असून येथे रोजंदारीवर काम करणाऱ्या लोकांची संख्या जास्त असून टाळेबंदीमुळे त्यांच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ताळेबंदी समाप्त झाल्यानंतर आर्थिक मंदी येवून त्यांचा रोजगार/व्यवसाय संपुष्टात येण्याची शक्यता निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गडचिरोली जिल्हयाकरीता विशेष आर्थिक मदत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (११-११-२०२१) :** (१), (२), (३) व (४) ताळेबंदी काळात आर्थिक नुकसान अथवा उपासमारीसंदर्भात अपर कामगार आयुक्त नागपूर कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, राज्यातील विविध आर्थिक दुर्बल घटकांकरिता जसे परवानाधारक रिक्षाचालक, नोंदणी सक्रिय घरेलू कामगार, नोंदणी सक्रिय बांधकाम मजूर, अधिकृत फेरीवाले व पथविक्रेते यांना राज्य शासनाकडून अर्थसहाय्य देणेबाबतची कार्यवाही करण्यात आली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गायरान जमिनींवर शेततळी उभारणेबाबत

**(१६) १२१२४ (१६-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील गावांमध्ये मोठया प्रमाणावर शासकीय गायरान जागा उपलब्ध असून ती पडीक स्वरुपात असल्याने उक्त जागेवर अतिक्रमण होत असून या गायरान जागेचा नामशेष होत चालल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गायरान जागेवर रोजगार हमी योजनेंतर्गत शेततळी उभारुन त्याचा फायदा रोजगार हमी योजनेंतील काम करणाऱ्या कामगारांना तसेच शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्याकरिता होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोजगार निर्मिती व पाणी उपलब्धता अशी दोन्ही गोष्टी मार्गी लावण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२१-१०-२०२१) :** (१), (२) व (३) मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दि. २८.०१.२०११ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार गायरान/ गुरुचरण/ गावक-यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती खाजगी संस्था, संघटना यांना मंजूर न करण्याबाबत व अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत दि.१२.०७.२०११ च्या शासन निर्णयान्वये धोरण ठरविण्यात आले आहे.

तसेच, राज्यातील शासकीय जमिनीवरील वाढते अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाने वेळोवेळी शासन निर्णय व परिपत्रके काढून प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत. शासनाच्या दि. १०.१०.२०१३ च्या परिपत्रकान्वये शासकीय, पड, गायरान जमिनीवरील किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वजनिक, मोकळ्या जागेवर अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर अतिक्रमण तात्काळ निष्कासित करण्याची कार्यवाही करावी, अशा सूचना सर्व संबंधितांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुलुंड येथील जिल्हा ग्रंथालय इमारतीची दुरुस्ती करून ग्रंथालय पूर्णवत सुरू होण्याबाबत**

**(१७) १३०९१ (१५-०८-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (मुंबई) येथील जिल्हा ग्रंथालयाच्या इमारतीची मागील अनेक वर्षे दुरुस्ती न झाल्यामुळे सध्या ग्रंथालय बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीची दुरुस्ती करण्यासंदर्भात बृहनमुंबई महानगरपालिकेकडे पत्राद्वारे विनंती करण्यात आलेली असून कोविड-१९ चा संसर्ग होऊ नये याकरिता शासनाच्या आदेशांनुसार ग्रंथालय सेवा लॉकडाऊन कालावधीमध्ये स्थगीत ठेवण्यात आलेल्या आहेत, हे ही, खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या ग्रंथालयात असलेल्या पुस्तकांचे जतन करण्यासह इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच ग्रंथालय सुरू होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२८-१०-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

बृहन्मुबई महानगर पालिकेच्या जुन्या इमारतीमध्ये सदर ग्रंथालय कार्यरत असून इमारतीची डागडुजी करण्याबाबत महानगरपालिकेला कळविण्यात आले आहे. तथापि, यामुळे ग्रंथालय बंद नसून कोविड-१९ चा संसर्ग होऊ नये म्हणून ग्रंथालय सेवा लॉकडाऊन कालावधीमध्ये स्थगीत ठेवण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) पावसाच्या पाण्याने ग्रंथसंपदा खराब होऊ नये म्हणून ग्रंथांचे रॅक हलवून सुरक्षित जागेत सुव्यवस्थितपणे ठेवण्यात आले आहेत. तसेच, ग्रंथांना वाळवी लागून खराब होऊ नये म्हणून ग्रंथालयामध्ये पेस्ट कंट्रोल नियमित पणे केले जाते. याशिवाय वेखंड पावडर व डांबर गोळ्यांचाही उपयोग केला जातो. कोरोना विषाणूच्या अनुषंगाने ग्रंथालय सेवा सुरु करण्याबाबत सूचना प्राप्त होताच, ग्रंथालय सेवा नियमितपणे सुरु करण्यात येतील.

---

**तळोजे (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कंपन्यांमुळे प्रदूषणात वाढ होत असल्याबाबत**

**(१८) १४८६९ (१८-११-२०२०). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील तळोजा, खारघर, कळंबोली व कामोठे (ता.पनवेल, जि.रायगड) या परिसरातील औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक कंपन्यांमुळे हवा आणि पाणी प्रदूषित होत असल्याने परिसरातील नागरिकांचे तसेच सिडको वसाहतीतील नागरीकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधीनी सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्याकडे तसेच सामाजिक संघटनांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या निर्णयानुसार या परिसरातील कंपन्यांना १५ कोटी रुपये दंड करुनही अद्याप सदर कंपन्यांनी प्रदुषण कमी करण्याबाबत कोणतीच उपाययोजना केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार प्रदुषण कमी करण्याकरिता शासन तथा प्रदुषण नियंत्रण मंडळाने संबंधित कंपन्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (०२-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये २७.५ एमएलडी क्षमतेची प्राथमिक व व्दितीय स्वरूपाची सामुहिक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा कार्यरत आहे. सदर औद्योगिक वसाहतीतील वायु प्रदूषणकारी उद्योगांनी आवश्यकतेनुसार विविध प्रकारच्या वायू प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा बसविल्या आहेत.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तळोजा औद्योगिक वसाहतीमधील उद्योगांची वेळोवेळी पाहणी केली जाते व पाहणीदरम्यान दोषी आढळून आलेल्या कारखान्यांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दि. ०७.१०.२०२० रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने तळोजा औद्योगिक वसाहतीची पाहणी करण्यात आली व पाहणीदरम्यान दोषी आढळलेल्या एकूण ८ कारखान्यांना उत्पादन बंदचे आदेश, एका कारखान्याला प्रस्तावित निर्देश व तीन कारखान्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचांदूर (जि.चंद्रपूर) शहरात माणिकगड सिमेंट कंपनीमुळे प्रदुषणात वाढ होत असल्याबाबत**

**(१९) १८३५२ (१९-११-२०२०). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचांदूर (जि.चंद्रपूर) शहरात मागील अनेक वर्षापासून माणिकगड सिमेंट कंपनीमधून निघणाऱ्या धुळीमुळे वायु प्रदूषण होऊन परिसरातील नागरिकांना श्वसनाचे विकार तसेच विविध प्रकारचे आजार होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानीक नागरिकांनी वारंवार प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी करूनही संबधित कंपनीवर कारवाई करण्यास दिरंगाई होत असल्याने उक्त कंपनीवर कारवाई न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा तेथील नागरिकांनी जिल्हाधिकारी, तहसीलदार व मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून वायु प्रदूषण करणाऱ्या सीमेंट कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिति काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०२-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मे. माणिकगड सिमेंट कंपनीच्या वायु प्रदूषणाबाबतच्या तक्रारी माहे ऑक्टोबर-२०२० ते मार्च-२०२१ दरम्यान स्थानिक नागरीकांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने सदर उद्योगाची तसेच उद्योग परिसराची पाहणी करण्यात आलेली होती. पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने सदर उद्योगास दि. २३/१०/२०२० रोजी कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली होती. सदर उद्योगाने कारणे दाखवा नोटीसाचे अनुपालन न केल्याने रू. १०.०० लक्षची बँक हमी माहे जुलै-२०२१ मध्ये जप्त करण्यात आलेली असून उद्योगास जप्त केलेल्या बँक हमीच्या दुप्पट रकमेची बँक हमी मंडळाकडे जमा करण्याचे निर्देश सुध्दा देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील कोळशाच्या वाहतुकीमुळे नागरीकांच्या आरोग्यावर होणारा दुष्परिणाम**

**(२०) १८४३५ (१९-११-२०२०). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि. यवतमाळ) परीसरामध्ये ११ कोळसाखाणी असून त्यापैकी उकणी, मुगोली, निलजई, घोन्सा, नायगांव जुनाड, कोल्हार, भांदेवाडा या कोळसा खाणीत कोळशाचे उत्पादन सुरू असल्याने येथील मानवी वसाहतीत कोळसा वाहतुकीमुळे हवेतील धुळीचे प्रमाण वाढल्याने सुक्ष्मधुलीकणाचे प्रमाण २०० पेक्षा अधिक असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान आढळुन आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निरीच्या अहवालानुसार सर्वाधिक धुळीचे प्रदुषण मालधक्का परीसरात असून वणी हे चंद्रपुर येथील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ कार्यालयाअंतर्गत येत असल्याने कार्यालयातील अधिकारी यांचे याकडे दुर्लक्ष होत असून परीसरातील नागरीकांनी तक्रार करूनही

कोणत्याच उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचे निदर्शनात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (०२-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
हवेच्या गुणवत्ता मापनाकरिता राज्यस्तरीय हवा गुणवत्ता मापन कार्यक्रम (SAMP) या प्रकल्पाअंतर्गत वणी क्षेत्रामध्ये तीन ठिकाणी (एमआयडीसी वणी दाल मिल, तहसिल कार्यालय वणी व ग्रामपंचायत चिखलगांव) मॅन्युअल स्टेशन कार्यान्वित आहेत. सदर ठिकाणी PM१० धुलीकणांच प्रमाण २००µg/m³ पेक्षा कमी आहे.
(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वणी परिसरातील कोळसा खाणींच्या वाहतूकीमुळे तसेच मालधक्का परिसरामधील कोळशाच्या हाताळणीमुळे होणा-या हवेचे प्रदूषणाकरिता वेस्टर्न कोलफील्ड्स लिमिटेड च्या सदर मालधक्का आस्थापनेची रू. २.५ लक्ष इतक्या रकमेची बँक हमी जप्त केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्याबाबत

**(२१) २०३०१ (१७-१२-२०२०). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांना राज्यमंत्री मंडळाने घेतलेला निर्णय व शिफारशीनुसार दि.२३ मार्च २०१७ रोजी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने शासन निर्णय काढून शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात आला असताना अद्याप या कर्मचाऱ्यांना (कार्यरत/सेवानिवृत्त) त्याचा कोणताही लाभ व फायदे देण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अत्यावश्यक सेवा असलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांनी कोरोना काळात अखंडीत पाणी पुरवठा केला असून १०० वर्षाचा अनुभव असलेल्या या प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांकडून 'जलजीवन मिशन' ची कामे करुन घेणे, ७ वा वेतन आयोग लागू करणे, पदोन्नती देणे व रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२९-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते तसेच निवृत्तीवेतनाचे दायित्व शासनाने दिनांक २३.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये स्विकारले असून प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतनभत्ते तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे निवृत्तीवेतन लाभ अदा

करण्यासाठी प्राधिकरणाला दरवर्षी शासनाकडून अनुदान वितरीत करण्यात येत आहे. तसेच प्राधिकरणाने सन २०१४ पासून कर्मचा-यांच्या महागाई भत्यामध्ये वाढ केली नव्हती. दिनांक ५.९.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्राधिकरणातील कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्यात आला आहे. दिनांक २३.३.२०१७ च्या शासन निर्णयानंतर प्राधिकरणाने दि.१.४.२०१४ ते दि.२२.३.२०१७ या कालावधीतील थकीत महागाई भत्याची रक्कम कर्मचा-यांना अदा केली आहे.

(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांना दिनांक २३.९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १.४.२०१७ पासून ७ वा वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सन २०२०-२१ या वर्षात प्राधिकरणाने एकूण २१३ अधिकारी/कर्मचा-यांना पदोन्नत्या दिल्या आहेत. नवीन भरती करण्यासंदर्भात निर्बंध असल्याने, प्राधिकरणामध्ये नवीन भरती करता आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेतलेले पेपर विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये दिसत नसल्याबाबत**

**(२२) २०३५१ (०७-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सन २०२० मध्ये अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या हॉटेल मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी सहा विषयांची परीक्षा असून विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये केवळ चार विषयाची परीक्षा दिली असल्याचे दिसून आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी दिनांक २३ व २४ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास घेतलेले दोन पेपर, विधी तसेच हॉटेल मॅनेजमेंट अभ्यासक्रमाचा पेपरही विद्यार्थ्यांच्या लॉगीन मध्ये दिसत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास. विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (३०-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

परीक्षेनंतर उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन व निकालाची प्रक्रिया सुरु असताना तांत्रिक प्रक्रियेमध्ये तात्पुरत्या स्वरुपाचे तांत्रिक दुरुस्तीचे काम सुरु असताना विद्यार्थ्यांना सदर पेपरचे स्टेटस दिसत नसल्याने विद्यार्थ्यांनी गैरसमज करुन घेतला असावा. तांत्रिक प्रक्रियेमध्ये दुरुस्ती करीत असताना उपलब्ध संपूर्ण डाटा स्वतंत्र फाईलमध्ये सेव्ह करण्यात आला होता.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोपरगाव मतदार संघातील गावतळी, साठवण व पाझर तलावांचे पाणी पाणी पुरवठा योजनांसाठी आरक्षित करण्याबाबत**

**(२३) २७१११ (२०-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव मतदार संघातील अनेक गावातील गावतळी, साठवण व पाझर तलावांचा साठा गोदावरी कालव्याच्या अतिरिक्त पाण्यातून केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावतळी, साठवण व पाझर तलावावर अवलंबून असणाऱ्या पाणी पुरवठा योजनांचे पाणी आरक्षित करण्याची मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२६-१०-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

गोदावरी कालव्यांचे लाभक्षेत्रातील ज्या गावांना पिण्याच्या पाण्याचे आरक्षण मंजुर नाही अशा गावांना त्यांचे मागणीनुसार व आवश्यकतेनुसार जिल्हाधिकारी यांचे मार्फत दरवर्षी पिण्याच्या पाण्याचे आकस्मिक आरक्षण करण्यात येते.

तसेच गोदावरी खोऱ्यातील वर्ष- २००५ च्या समन्यायी कायदयानुसार व मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार औरंगाबाद जिल्हयातील पैठण येथील जायकवाडी धरण पावसाळयात १०० % भरल्यानंतर लाभक्षेत्रातील व लाभक्षेत्राबाहेरील गावतळी,साठवण तलाव व पाझर तलाव यांना उपलब्धतेनुसार पावसाळयात पूर पाणी देण्यात येते.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डीबीटी योजनेच्या स्वरूपात बदल करून लाभार्थ्यांना वस्तूंचे वाटप करणेबाबत**

**(२४) २७१४२ (२४-०३-२०२१). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या डीबीटी (प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण) योजनेतून मिळणाऱ्या वस्तू तसेच शेतीसाठी अवजारे खरेदी करण्यासाठी योजनेच्या लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अनेक लाभार्थी वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार डीबीटी योजनेच्या स्वरूपात बदल करून या योजनेच्या लाभार्थ्यांना वस्तूंचे वाटप करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१२-११-२०२१) :** (१) व (२) पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या डीबीटी योजना अर्थात प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण योजना राबविण्यात येत आहे. या योजनांचे लाभार्थी ज्या योजनेसाठी पात्र ठरतात त्या लाभार्थ्यांना त्या त्या योजनेतून मिळणारी कोणतीही वस्तू अथवा शेती औजार अगोदर खरेदी करावे लागते. शासन निर्णय दि.५ डिसेंबर, २०१६ तसेच दि.९ जानेवारी, २०१७ अन्वये “विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबत” धोरण निश्चित करण्यात आले असून, त्यातील मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व जिल्हा परिषदांकडून कार्यवाही करण्यात येत आहे. संबंधित जिल्हा परिषदांकडून यासंदर्भात कोणत्याही तक्रारी अथवा कार्यवाहीमध्ये अडचणीबाबत पत्र/निवेदने प्राप्त झालेले नाहीत.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील अनुदानास पात्र असलेल्या ग्रंथालयांना अनुदान मिळण्याबाबत**

**(२५) २७२६३ (११-०६-२०२१). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानास पात्र असलेल्या १२१४९ ग्रंथालयांना सन २०२०-२१ मध्ये आर्थिक वर्षाचे अनुदान अद्याप वितरीत करण्यात आले नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रंथालयामध्ये काम करणाऱ्या २१ हजार ६१५ कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व ग्रंथालयांना दरवर्षी दोन टप्प्यात अनुदान वितरित केले जात असल्यामुळे ग्रंथालय चालकांना नियमित खर्च करणे कठीण जात असल्यामुळे उक्त सर्व ग्रंथालयाना दिले जाणारे अनुदान प्रतिमाह देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) असल्यास, अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२८-१०-२०२१) :** (१) हे अशंत : खरे आहे.
(२) शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचारी हे संबंधित स्वायत्त संस्थेचे कर्मचारी असून त्यांच्या सेवाशर्ती व वेतन देणे या बाबी संबंधित संस्थेशी निगडीत आहेत.
(३) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहायक अनुदान आणि इमारत व साधन सामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० मध्ये प्रतिवर्षी माहे ऑगस्ट/सप्टेंबर मध्ये परिरक्षण अनुदानाचा पहिला हप्ता व माहे फ़ेब्रुवारी/मार्च मध्ये दुसरा/एकत्रित हप्ता देण्याची तरतूद आहे. त्यामुळे प्रतिमाह अनुदान देण्याचा प्रश्न उद्धवत नाही.
(४) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांच्या अनुदानाचा काही भाग निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात आला आहे. तसेच राज्यातील शासनमान्य

ग्रामपंचायत ग्रंथालयांचे सन २०२०-२१ मध्ये देय थकीत परिरक्षण अनुदान अदा करण्यासाठी रु.५१,४२,५००/- इतका निधी वितरीत करण्यास शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२१.०६.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे सन २०२०-२१ मध्ये देय थकीत परिरक्षण अनुदान अदा करण्यासाठी रु.३६,७५,३७,५००/- इतका निधी वितरीत करण्यास शासन निर्णय,दि. २२.०७.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, दि.१३.०८.२०२१ अन्वये शासनमान्य ग्रामपंचायत ग्रंथालयांचे अनुदान अदा करण्यासाठी रु.५१,४२,५००/- इतका निधी व शासन निर्णय, दि.२०.०८.२०२१ अन्वये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे थकीत अनुदान अदा करण्यासाठी रु.०९,५८,६२,५००/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील गुन्हे शाखेने रक्त चदंनाचे ओंडके जप्त केल्याबाबत**

**(२६) २७४२० (१०-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गुन्हे शाखेच्या कक्ष पाचच्या प्रभारी पोलिस निरीक्षक यांनी बंगरुळ येथुन चोरीच्या मार्गाने परदेशात पाठविण्यात येणारे सुमारे पावणे २ कोटी रुपये किंमतीचे १७८० किलो वजनाचे रक्त चदंनाचे ओंडके जप्त करुन चार आरोपीना दिनांक ५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी करुन त्यानुसार अटक केलेल्या आरोपींद्वारे रक्तचंदनाची तस्करी करणाऱ्या मुख्य सुत्रधाराचा शोध घेऊन व त्यास अटक करुन हे वर्षानुवर्षे पासुन सुरु असलेले तस्करीचे रॅकेट उध्वस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, यासंदर्भात उच्च स्तरावरुन शासनाने कोणते आदेश निर्गमित केले आहेत व त्यानुसार शासनाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-११-२०२१) :** (१) होय, या प्रकरणी गुन्हे प्रकटीकरण शाखा गु.र.क्र.४५/२०२१ कलम ३७९, ३४ भा.दं.वि. सह भारतीय वन कायदा १९२७ कलम ४१, ४२ सह महाराष्ट्र वन नियम २०१४ मधील नियम क्र. ३१,८२ सह महाराष्ट्र (ग्रामीण विभाग) वृक्ष संवर्धन कायदा १९७५ मधील कलम ३,४ अन्वये दिनांक ०४.०४.२०२१ रोजी गुन्हा दाखल करुन सदर गुन्ह्यात दिनांक ०४.०४.२०२१ रोजी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(२) सदर गुन्ह्यात अद्याप पर्यन्त एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकीच गुन्हयातील मुख्य सुत्रधार यास दि.१६.०७.२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.
(३) सदर गुन्ह्यामधील अटक आरोपींकडून प्राप्त माहितीचे अनुषंगाने इतर पाहिजे आरोपी यांचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याच्या तपास प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भभवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाच्या मुख्यालयातील सर्व्हर हॅक झाल्याबाबत**

**(२७) २७४७७ (१०-०६-२०२१). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाच्या मुख्यालयातील होस्ट केलेल्या लोकल सर्व्हरवर सायनॅक (SYNCK) रॅन्समवेअर ही वेबसाईट दिनांक २१ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास हॅकर्सने संगणीकृत हल्ला केल्यामुळे महामंडळाचे सर्व संगणकीय कामकाज बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सायबर हल्लेखोरांनी एमआयडीसीच्या मेल आयडीवर मेल करुन ५०० कोटी रुपयांची मागणी करुन ती रक्कम न दिल्यास महामंडळाच्या संगणकीयकृत डेटा नष्ट करण्याची धमकी दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सायबर हल्ल्याप्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पोलिसांकडे गुन्हा नोंदविला आहे काय, त्यानुसार पोलीस तपासामध्ये काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुषंगाने या गुन्हयातील संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच, यापुढे असा सायबर हल्ला होऊ नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२७-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीत ५०० कोटीची मागणी करुन ती रक्कम न दिल्यास महामंडळाच्या संगणकीकृत डाटा नष्ट करण्याची धमकी दिली असल्याचे नमुद नाही.

हल्लेखोरांनी खंडणीची Note, बाधित सर्वरवर ठेवली होती. तसेच त्यामध्ये हल्ल्याची माहिती आणि डेटा डिक्रिप्शनसाठी त्यांच्याकडे जाण्याच्या पर्यायांची माहिती दिली होती. तथापि खंडणीच्या Note मध्ये खंडणीच्या रकमेचा थेट उल्लेख करण्यात आलेला नव्हता.

(३) व (४) फिर्यादी, महाव्यवस्थापक एम.आय.डी.सी., मुंबई यांनी दि.३१.०३.२०२१ रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन मुंबई सायबर पोलीस ठाणे येथे वि. स्था. ख. नो. क्र. ०३/२०२१ कलम ४३ (अ) (फ), ६६ माहिती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारित) २००८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गोपनीय बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने आरोपिताचा शोध घेण्याचे काम चालू असून प्रकरण तपासाधिन आहे.

राज्यात सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी एकूण ४६ सायबर लॅब्स सुरू करण्यात आल्या असुन त्यापैकी ४३ सायबर लॅब्सना सायबर पोलीस ठाणे म्हणुन घोषित करण्यात आले आहे, एकुण १९२२ अधिकारी व अंमलदारांना दीर्घकालीन प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच मंत्रालयातील अधिकारी कर्मचा-यांसाठी जनजागृती शिबीरे आयोजित करण्यात आली आहेत. सर्व प्रकारचे ऑनलाईन फ्रॉड रोखण्याकरिता महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून उपलब्ध सर्व आधुनिक संसाधने जसे प्रेस, टिव्ही चॅनल्स, युट्युब, ट्विटर, फेसबुक, वेबसाईटचा उपयोग करून जनजागृती करण्यात येते. तसेच विविध जनजागृती शिबिरे आयोजित करुन आजतागायत ६४,२३४ नागरिकांना सायबर सुरक्षेबाबत जागृत करण्यात आले आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील व दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील होमगार्ड्सना वेतन अदा करण्याबाबत

**(२८) २७४८८ (१०-०६-२०२१). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील १५० होमगार्डसना मागील तीन महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे तसेच दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील गृहरक्षक दलाच्या होमगार्ड जवानांना मागील सहा महिन्यांपासून वेतन न मिळाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, होमगार्डचे थकीत असलेले वेतन त्वरीत मिळण्याबाबतची मागणी गृहरक्षक दलाच्या जवानांनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिसांबरोबरच कोरोना काळात काम केलेल्या होमगार्ड्सचे वेतन वेळेत अदा न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबतची चौकशी करुन होमगार्ड्सना त्यांचे थकित वेतन तात्काळ अदा करण्यासह यापुढे त्यांचे वेतन वेळेत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२४-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) होय

(३) व (४) सन २०२०-२१ या वर्षातील रु.२२२.५० कोटी इतकी संपूर्ण तरतूद वितरीत केलेली आहे. आतापर्यंत शासनाने एकूण रु.२४० कोटी एवढा निधी होमगार्डच्या मानधनासाठी वितरीत केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोरोना संसर्गामुळे पालक गमावलेल्या बालकांना शासनाच्या विविध योजनाचा लाभ मिळण्याबाबत

**(२९) २७५४६ (१५-०६-२०२१). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गामुळे २९१५ बालकांनी आपल्या पालकांना गमावले असून त्यापैकी ११४ बालकांच्या आई आणि वडील दोघांचाही मृत्यू झाला असून २८०१ बालकांच्या

एका पालकांचा मृत्यू झाले असल्याने त्यांचे आर्थिक व शैक्षणिक नुकसान होत असल्याने अशा बालकांच्या कल्याणासाठी शासनाने योजना जाहिर केल्या असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना संसर्गामुळे जाहिर करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे अनाथ मुलांना दोन वेळचे जेवण मिळत नसल्याच्या अनेक घटना निदर्शनास आल्या असून या बहुतांश मुलांकडे रेशन कार्ड, आधार कार्ड इत्यादी कोणतीच कागदपत्रे नसल्याने शासनाकडून मिळणाऱ्या योजनांचा लाभ या मुलांना मिळत नसल्याचे देखील निदशर्नास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनाथ झालेल्या तसेच घरातील कमावणारी व्यक्ती गेल्याने निराधार झालेल्या बालकांची, मुलांची, वयोवृद्ध नागरिकांची, किंवा कोरोना मुळे पती वारल्याने विधवा झालेल्या महिला या सर्वांची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध आहे काय,

(४) तसेच, कोरोनामुळे पालक गमावलेल्या अनाथ झालेल्या बालकांची फेसबुक, व्हाट्सअँप, इंस्टाग्राम, ट्विटर आदी समाजमाध्यमांचा वापर करून ही बालके दत्तक घेण्यासाठी उपलब्ध असल्याचे भावनात्मक पोस्ट टाकून काही समाजकंटकांनी बालकांची विक्री करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, अनाथ झालेल्या बालकांचे यथायोग्य संगोपन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली कृतीदल (Task Force) स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून संबंधित शासन निर्णय महिला व बाल विकास विभागाकडून जारी करण्यात आला आहे काय, तसेच राज्यातील किती व कुठल्या जिल्ह्यात कृतीदल स्थापन करण्यात आले आहे,

(६) असल्यास, ज्या बालकांचे दोन्ही पालक मृत्यू पावले किंवा एक पालक मृत्यू पावले आहेत अशा बालकांच्या संगोपनासाठी त्यांना आर्थिक मदत व त्यांच्या भविष्यातील शिक्षणापर्यंतचे लाभ देण्यासाठी तसेच अनाथ मुलांना शासनाच्या विविध योजनांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी या मुलांना आवश्यक असलेले कागदपत्रे मिळण्यासाठी उपाय योजना करण्याबाबत तसेच अनाथ बालकांची बेकायदेशीररीत्या विक्री करण्या-या समाजकटंकावर कारवाई करण्यासह या अनाथ बालकाचे दत्तकविधी प्रक्रीया कायदेशीररीत्या होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२२-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे,

कोविड-१९ संसर्गामुळे दोन्ही पालकांचे निधन होवून अनाथ झालेल्या बालकांना अर्थसहाय्य उपलब्ध करणेबाबतची योजना शासन निर्णय क्र. अनाथ २०२१/ प्र.क्र ४९/का.०३ दि. १७.०६.२०२१ अन्वये लागू करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि, कोविड-१९ प्रादुर्भावाच्या काळात राज्यातील बालकांची काळजी व संरक्षणाचे काम करणाऱ्या संस्थांमधील बालकांना तसेच कोवीड -१९ मुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देवून त्यांचे यथायोग्य संगोपन होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासाठी शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२१/प्र.क्र.६२/का.०८ दि. ०७.०५.२०२१ अन्वये जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कृती दल (Task Force) गठित

करण्यात आले आहे. या कृती दलाच्या माध्यमातून अनाथ झालेल्या मुलांना अन्न, वस्त्र, निवारा वैद्यकीय सहाय्य आणि आवश्यकतेनुसार कायदेशीर सहाय्य उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

तसेच अनाथ मुलांना शिधापत्रिका वितरीत करणेबाबत अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, शासन निर्णय दि. २३ जून, २०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(३) दि. २१.१०.२०२१ रोजी कोविड-१९ संसर्गामुळे दोन्ही पालकांचा मृत्यू झालेला आहे अशा बालकांची एकूण संख्या ६३८ तर एका पालकाचे निधन झालेल्या बालकांची संख्या २०४९४ इतकी आहे. तसेच कोविड-१९ मुळे पती वारल्यामुळे विधवा झालेल्या महिलांची संख्या १८२७४ इतकी आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय, हे खरे आहे.शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२१/प्रक्र६२/का.०८ दि. ०७.०५.२०२१ अन्वये राज्यातील सर्व जिल्हयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कृती दल (Task Force) गठित करण्यात आले आहे.

(६) कोविड-१९ संसर्गामुळे एक किंवा दोन्ही पालकांचे निधन होवून अनाथ झालेल्या बालकांना रु. ५ लक्ष इतक्या रकमेच्या मुदत ठेवीच्या स्वरुपात अर्थसहाय्य उपलब्ध करुन घेण्याबाबत योजना शासन निर्णय क्र. अनाथ २०२१/प्र.क्र ४९/का.०३ दि. १७.०६.२०२१ अन्वये लागू करण्यात आलेली आहे. तसेच कोविड-१९ मुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना बालसंगोपन योजनेअंतर्गत दरमहा रु. ११०० इतके अर्थ सहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच कोविड-१९ प्रादुर्भावाच्या काळात राज्यातील दोन्ही पालक अथवा एक पालक गमावलेल्या बालकांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देवून त्यांचे यथायोग्य संगोपन होण्यासाठी व सर्वप्रकारच्या योजनांचा लाभ उपलब्ध करण्यासाठी शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२१/प्र.क्र.६२/का.०८ ०७.०५.२०२१ अन्वये जिल्हास्तरीय कृती दल (Task Force) गठित करण्यात आले आहे.

---

**नागपूर येथील म्युकरमायकोसिस आजारावरील इंजेक्शन वाटपात झालेला गैरप्रकार**

**(३०) २७७०२ (११-०८-२०२१). श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकिय वैद्यकिय महाविद्यालयास म्युकरमायकोसिस वर उपचाराकरिता वापरण्यात येणारी इंजेक्शनचे कमी प्रमाणात वाटप होऊन खाजगी रुगणालयांना अधिक प्रमाणात इंजेक्शनचे वाटप झाले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सार्वजनिक ग्रंथालये विशेष अनुदानपासून वंचीत असल्याबाबत**

**(३१) २७८५७ (११-०६-२०२१). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे कामकाज आणि विकासाबाबत शासनाला सहाय्य देणाऱ्या राज्य ग्रंथालय परिषदेची शेवटची पुनर्रचना सन २००६ मध्ये झाली असून त्यांची मुदतही सन २००९ मध्ये संपुष्टात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक ग्रंथालये अनुदानापासून वंचित आहेत, हे ही खरे काय,
(३) असल्यास, या परिषदेची पुनर्रचना करण्यास होणाऱ्या विलंबाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये (सहायक अनुदान आणि इमारत व साधन सामग्री यासाठी मान्यता) नियम, १९७० व शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि.२१.०२.२०१२ मधील तरतुदीनुसार राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदान अदा करण्यात येत आहे.
(३) राज्य ग्रंथालय परिषदेची पुनर्रचना करण्याची बाब विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा प्रकल्पात गाळाचे सर्वेक्षण करुन पाणीसाठा पुर्नस्थापित करण्याबाबत**

**(३२) २७८७६ (१५-०६-२०२१). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा प्रकल्पात मोठ्या प्रमाणात गाळ साठल्याने पाणी साठवण क्षमता जवळपास ४०% कमी झाली असल्याने शेतकऱ्यांच्या सिंचनाचे हक्काचे पाणी कर्नाटक राज्यात वाहून जात असून सदर प्रकल्पात साठलेल्या गाळाचे २००३ प्रमाणे पुनश्च सर्वेक्षण मेरी नाशिक मार्फत करण्यात यावे तसेच सदरील प्रकल्पातील गाळ काढणे किंवा उंची वाढवून प्रकल्पाची पाणी साठवण क्षमता पुनश्च स्थापित करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री, यांना माहे एप्रिल २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे तसेच निम्न तेरणा कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत दिनांक १७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास मा.पालकमंत्री, लातूर यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने गाळाचे सर्वेक्षण त्वरित करण्याचे व त्यानुषंगाने कमी झालेला पाणीसाठा पुर्नस्थापित करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मा.जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री यांनी कार्यकारी संचालक, गोदावरी खोरे विकास मंडळ, औरंगाबाद यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकल्पातील गाळाचे सर्वेक्षण करण्यासह पाणीसाठा पुर्नस्थापित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२२-१०-२०२१) :** (१) होय, असे निवेदन दिले आहे.
(२) होय.
(३) मेरी नाशिक यांचेमार्फत सुदूर संवेदन तंत्राने निम्न तेरणा प्रकल्पातील गाळाचे सर्वेक्षण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोडाझरी (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) तलावातुन विना परवाना अवैध खनिज उत्खननासह वाहतुक होत असल्याबाबत**

**(३३) २७९८६ (०९-०६-२०२१). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घोडाझरी (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) तलावातुन विना परवाना अवैध खनिज उत्खनन व वाहतुक होत असल्याबाबतचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक १६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्याअनुषंगाने घोडाझरी तलावातुन विना परवाना अवैध खनिज उत्खननासह वाहतुक करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०९-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मौजा घोडाझरी ता. नागभीड, जि. चंद्रपूर येथील स.क्र.८१ आराजी मध्ये मुरुम या गौण खनिजाचे ५२ ब्रास अवैध उत्खनन केल्याप्रकरणी संबंधिताविरुध्द तहसिलदार नागभीड यांनी दि.०९/०६/२०२१ रोजीच्या आदेशान्वये रु.३,३२,८००/- एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील नवोदय बँकेतील गैरव्यवहाराबाबत**

**(३४) २८५१२ (१७-०६-२०२१). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील नवोदय बँक गैरव्यवहारातील करोडो रुपये घेऊन १४ आरोपी अद्याप फरार झाल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार या गैरव्यवहारातील आरोपींना अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-११-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी धंतोली पोलिस ठाणे, नागपूर शहर येथे दिनांक १५.०५.२०१९ रोजी भा.द.वि.कलम ४०६, ४०९, ४२०, १२०(ब), ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७७, (अ), सह कलम ३ एमपीआयडी ॲक्टसह कलम ६५, ६६(ब) माहीती व तंत्रज्ञान कायदयानुसार गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात मुळ दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून कलम १७३(८) सीआरपीसी प्रमाणे पुढील तपास सुरु आहे. सदर गुन्हयात ३३ आरोपी निष्पन्न असून १९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित १४ फरारी आरोपींना अटक करण्यासाठी मा.न्यायालयास विनंती करुन त्यांचे विरुध्द कलम ७३ सीआरपीसी प्रमाणे स्टँन्डीग वॉरंट प्राप्त करण्यात आले असून आरोपींचा शोध घेणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई विद्यापीठातील रिक्त पदे भरण्याबाबत.**

**(३५) २८५८४ (११-०६-२०२१). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात विविध स्तरावरील सुमारे १३१९ शैक्षणिक पदांना मान्यता असूनही एकूण ४५५ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई विद्यापीठाचा कार्यभार कंत्राटी कर्मचा-यांच्या मदतीने चालविला जात असल्याने पदवीधारक विद्यार्थ्यांचे भवितव्य कंत्राटी पध्दतीवर अवलंबून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांची संख्या ८८६ च्या आसपास पोहचली असतानाही महाविद्यालयातील कामकाज सांभाळण्यापासून ते विद्यार्थ्यांची संबंधित कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अधिकारी आणि कर्मचारी यांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) वित्त विभागाने शासन निर्णय दि.०४.०५.२०२० अन्वये कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वित्तीय स्थिती स्थित/सुरळीत रहाण्यासाठी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. त्यानुसार पदभरतीवर निर्बंध आणले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी व्याजदरामध्ये सूट देण्याबाबत**

**(३६) २९२३४ (१३-०७-२०२१). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बचतगटांसाठी असलेल्या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी कोरोना काळात जाहिर केलेल्या टाळेबंदीमध्ये महिला बचत गटांमार्फत चालावण्यात येणाऱ्या छोट्या व्यवसायांवर झालेला परिणामांचे आकलन करणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनाच्या प्रदूर्भावामूळे सर्व प्रकारच्या कर्ज परताव्यात विलंब झालेला असताना देखील राज्यातील महिला बचत गटांनी कर्ज भरपाई नियमितपणे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पार्श्वभूमीवर महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी व्याजदरामध्ये सूट देण्याबाबतचे धोरण शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, व्याजदरामध्ये सूट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याचे स्वरुप काय आहे?

**श्री. हसन मुश्रीफ (१२-१०-२०२१) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.
(३) व (४) राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या केंद्र शासनाकडून व्याज अनुदान प्राप्त झालेल्या पात्र महिला स्वयंसहाय्यता समुहांना सवलतीच्या व्याजदराने कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी व्याज अनुदान देण्याकरीता "सुमतीबाई सुकळीकर उद्योगिनी महिला सक्षमीकरण योजना" शासन निर्णय दिनांक १४.१०.२०१६ अन्वये सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या केंद्र शासनाकडून व्याज अनुदान पात्र महिला स्वयंसहाय्यता समुहांना प्रभावी ०% व्याजदराने कर्ज पुरवठा प्राप्त होतो. सन २०१९ ते २०२०-२१ या कालावधीमध्ये नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या एकूण १,४६,१२० स्वयंसहाय्यता समूहांना रु.२९ कोटी रकमेचे व्याज अनुदान अदा करण्यात आले आहे.

---

**कंळबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे जीवघेणा हल्ला करणाऱ्या रेतीमाफीयांवर कारवाई करण्याबाबत**

**(३७) २९५५१ (१७-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंळबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे अनधिकृत गौण खनिजांची वाहतूक केलेला डंपर, तलाठी कारवाईसाठी तहसिल कार्यालयात घेऊन जाताना फॉर्चुन कारमधुन आलेल्या पाच रेतीमाफियांनी डंपर अडवून तलाठ्यावर हल्ला केल्याची घटना दिनांक १५ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी तहसिलदार, पनवेल यांनी मोक्का अंतर्गत कारवाई करण्यासाठी कंळबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या घटनेतील फरार आरोपीना अटक करुन त्याच्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०९-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व ४) उक्त प्रकरणी कळंबोली पोलिस ठाणे येथे नायब तहसिलदार यांनी केलेल्या तक्रारीस अनुसरुन कळंबोली पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.८८/२०२१, भा.द.वि.स. कलम ३५३, ३४१, १४३, ५०४, ५०६,१८८, २६९,२७० सह साथ रोग प्रतिबंधक अधिनियम, १८४७ च्या कलम ३ नुसार गुन्हा दाखल करून त्यातील ९ आरोपींना अटक करण्यात आली. सदर आरोपींवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असून उर्वरीत आरोपींचा शोध घेवून अटक करण्याची तजविज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील अंधारी (ता.गोंडपिपरी) नदीमधुन व वर्धा (ता.कोरपना) नदीपात्रातून रेतीचे उत्खनन सुरु असल्याबाबत**

**(३८) २९५९० (०९-०६-२०२१). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील अंधारी (ता.गोंडपिपरी) नदीमधुन व वर्धा (ता.कोरपना) नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात चोरीच्या मार्गाने रेतीचे हजारो ब्रास उत्खनन जेसीबीच्या सहाय्याने सुरु असल्यामुळे शासनाच्या कोटयावधी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हजारो ब्रास रेतीचा अवैध साठा जमा करून त्याचा वापर अंधारी नदी काठावरील पुलाच्या बांधकामासाठी करण्यात येत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने अंधारी नदी व वर्धा नदी पात्रातून रेतीचे उत्खनन करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२२-११-२०२१) :**
(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) मौजे तारडा, ता. गोंडपिंपरी, जि. चंद्रपूर येथे अंधारी नदीवर पुलाचे बांधकाम सुरु आहे. नदी पात्रात सदर काम करताना खोदकामातून निघणाऱ्या रेतीचा साठा करण्यासाठी सदर कंपनीने जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांची परवानगी मागीतली असून त्याबाबत कार्यवाही प्रस्तावीत आहे. सदर रेतीचा त्याच बांधकामासाठी वापर होणार नाही याबाबत लेखी हमी कंपनीने दिली आहे.

गोंडपिंपरी व कोरपना तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरिता तालुकास्तरावर भरारी पथके स्थापन केली आहेत. त्यांनी माहे एप्रिल, २०२१ ते माहे मे, २०२१ या कालावधीमध्ये गोंडपिंपरी तालुक्यात एकूण ०३ प्रकरणात रु.४,८७,०००/- व कोरपना तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या एकूण ११ प्रकरणात रु.३,३२,७००/- एवढा महसूल जमा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने देण्याबाबत**

**(३९) ३०३७२ (१५-०६-२०२१). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता माहे जानेवारी, २०२० पासून देण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य कर्मचारी संघटना व निवृत्त शासकीय कर्मचारी संघटना यांनी सदरहू महागाई भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने देण्याबाबत शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?
**श्री. अजित पवार (१८-११-२०२१) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) व (४) सर्वसाधारणपणे महागाई भत्ता मंजूरीबाबत केंद्र शासनाप्रमाणे धोरण अनुसरण्यात येते. त्यानुसार केंद्र शासनाने केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना व निवृत्तिवेतनधारकांना महागाई भत्ता वाढ मंजूर केल्यानंतर राज्याची आर्थिक स्थिती विचारात घेऊन राज्य शासकीय व इतर पात्र

कर्मचाऱ्यांना व निवृत्तिवेतनधारकांना महागाई भत्ता वाढ मंजूर करण्यात येते. कोविड -१९ (कोरोना) विषाणूच्या साथीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत केंद्र शासकीय कर्मचारी आणि निवृत्तिवेतनधारकांना दिनांक १ जानेवारी, २०२०, दिनांक १ जुलै, २०२० आणि दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी देय असणारी महागाई भत्ता वाढ केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या दिनांक २३ एप्रिल, २०२० रोजीच्या आदेशान्वये गोठविण्यात आली आहे. त्यामुळे यासंदर्भात सद्यस्थितीत कोणतीही कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत कांदिवली (पूर्व) व गोरेगाव (पूर्व) येथे बनावट कोविड-१९ च्या औषधांच्या विक्रीबाबत.**

**(४०) ३११३३ (१८-०६-२०२१). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिमाचल प्रदेश येथील हेल्थ केअर फार्मा कंपनी बनावट कोविड-१९ ची कोट्यावधी रुपयांची औषधे विकत असल्याचे मुंबईतील राज्य अन्न व औषधी आयुक्तालयाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अन्न व औषधी आयुक्तालयाच्या अधिकाऱ्यांनी मुंबई येथील कांदिवली (पूर्व) व गोरेगाव (पूर्व) येथील होलसेल औषध विक्रेत्यांवर दिनांक ६ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास धाड टाकून कोट्यवधी रुपयांच्या कोविड-१९ औषधांच्या गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (२८-१०-२०२१) :** (१) व (२) खरे आहे.

(३) सदर प्रकरणी बनावट फॉविपीरविर टॅब्लेट्सचा साठा मे. मेडीटॅब वर्ल्डवाईड, समता नगर, कांदिवली पूर्व व मे. शिवसृष्टी सर्जिमेड तसेच मे. केप्स मेडिकेअर देवकरण मानसिओन या ३ ठिकाणावरुन जप्त करण्यात आला असून संबंधित दोषीविरुध्द प्रथम खबर अहवाल नोंदविलेला आहे. बनावट फॉविपरविर उत्पादन करणारी संस्था मे. मॅक्स रिलिफ हेल्थकेअर, जी.बी.नगर यांचे मालक व इतर २ व्यक्ती यांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीसामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासकीय दुध योजनेंतर्गत निश्चित केलेल्या दुध खरेदीच्या दराप्रमाणे दुध उत्पादकांना दर मिळण्याबाबत**

**(४१) ३२२२६ (११-०८-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुग्धव्यवसाय क्षेत्रात शासनाचा वाटा केवळ १ % इतकाच असून उर्वरित दुग्धव्यवसाय सहकार व खाजगी क्षेत्राकडून केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनामार्फत शासकीय दुध योजनेंतर्गत संकलित होणाऱ्या दुधाचे खरेदी व विक्री दर निश्चित करण्यात येत असतानाही खाजगी व सहकार क्षेत्रामार्फत दुध खरेदी-विक्रीचे दर त्यांचेमार्फत परस्पर निश्चित करण्यात येतात, हे हि खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय दुध योजनेंतर्गत निश्चित केलेल्या दुध खरेदीच्या दराप्रमाणे दुध उत्पादकांना दर मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, अभ्यासगटाने केलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (०९-११-२०२१) :** (१)सद्य:स्थितीत राज्यातील दुग्ध संकलनात शासनाचा वाटा ०.४०% इतका आहे.
(२) शासकीय दूध योजनेतंर्गत संकलित होणाऱ्या व खरेदी केल्या जाणाऱ्या दुधाचे दर शासनामार्फत निश्चित केले जातात.
(३) शेतकऱ्यांच्या दुधाला किफायतशीर भाव मिळावा यासाठी शासन वेळाेवेळी हस्तक्षेप करीत असते. दूध उत्पादक शेतकरी यांना खरेदी दरात वाढ मिळण्याकारीता सन २०१८-१९ मध्ये दूध व दूध भुकटी निर्यातीस प्रोत्साहनपर अनुदान योजना राबविण्यात आली. सन २०२० मध्ये कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेल्या लॉकडाऊन कालावधीमध्ये राज्यातील दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी अतिरीक्त ठरणाऱ्या दूधाचे रूपांतरण दूध भुकटीमध्ये करण्यास शासनातर्फे मान्यता देण्यात आली.
(४) राज्यातील दुग्ध उत्पादन वाढावे, दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना रास्त भाव मिळावा आदी बाबींबाबत शासनास अवगत करण्याच्या दृष्टीने समन्वयाकरीता दि.४.२.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७९ अ नुसार शासनातर्फेदि.१० जुलै, २०१५ च्या आदेशान्वये "शासनाने निश्चित केलेल्या दूध खरेदीचे दर हा प्रमाणक दर समजून त्याप्रमाणे शेतकऱ्यांना दूधाचे दर देण्याबाबत" निदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बुलढाणा जिल्ह्यातील शासकीय गोडावून मधून झालेल्या धान्य चोरीबाबत

**(४२) ३२२६६ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील वखार महामंडळ आणि इतर शासकीय धान्य गोडावुन फोडून धान्य चोरी करण्याचे प्रमाण वाढले असून दोन वर्षात तीन ठिकाणचे गोडावून फोडून चोरट्यांनी मका, तूर, हरभरा व इतर धान्य चोरून शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (०२-११-२०२१) :** (१) होय.
आधारभूत किंमत योजनेअंतर्गत भरडधान्य साठवणूकीकरिता बुलढाणा जिल्हयात सिंदखेड राजा रोडवर गोदाम भाडयाने घेण्यात आले आहे. सदर गोदामातील मका चोरीस गेल्याचे

लक्षात आले असता, पोलीस स्टेशन, देऊळगाव राजा येथे दि.१७.०९.२०२० रोजी फिर्याद दाखल करण्यात दाखल करण्यात आली आहे. त्यानुषंगाने तपास सुरू आहे. तसेच सदर प्रकाराची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या गोदामांवर योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(२) खामगाव (वरखेड) केंद्राअंतर्गत गोदामामधून मागील दोन वर्षात दि.२६.०३.२०१९ च्या रात्री व दि.२२.०१.२०२१ च्या रात्री अशा दोन चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. पोलीसांनी पकडलेल्या चोरांनी गोदामात चोरी केल्याबद्दल कबूली दिलेली आहे. तसेच त्यांच्याकडून चोरीचा माल जप्त करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिखली (जि. बुलढाणा) तालुक्यामध्ये मृत पशु उपयोगिता केंद्र सुरू करण्याबाबत

**(४३) ३२२७८ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या मृत शरीराची विल्हेवाट लावण्याची कोणतीही उपाययोजना नसल्यामुळे पशुपालक प्राण्यांचे मृत शरीर कुठेही फेकून देत असल्याने वातावरण दूषित होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे चिखली (जि. बुलढाणा) तालुक्यामध्ये मृत पशु उपयोगिता केंद्र सुरू करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पशुसंवर्धन मंत्री यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२२-१०-२०२१) :** (१) मृत पशु उपयोगिता केंद्र स्थापन करण्याची महाराष्ट्र शासनाची कोणतीही योजना सद्य:स्थितीत अस्तित्वात नाही.

नगर परिषद, चिखली यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार मृत जनावरांची विल्हेवाट नगर परिषदेच्या कंपोष्ट गाऊंडवर केली जाते.

(२) व (३) मा.मंत्री (पशुसंवर्धन) यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेली आहे. तथापि, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या पशुधन विकास या उप-अभियानांतर्गत मृत पशु उपयोगिता केंद्राची स्थापना ही योजना पंचायत राज / स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत कार्यरत होती. परंतु केंद्र शासनाकडून माहे जुलै, २०२१ मध्ये निर्गमित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पशुधन अभियानाच्या सुधारित मार्गदर्शक सूचनांमध्ये या योजनेचा समावेश करण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यामध्ये गवताचे गठ्ठे तयार करणाऱ्या मशीन उपलब्ध करून देणेबाबत**

**(४४) ३२२८२ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उन्हाळ्यात हिरवा चारा मिळत नसुन तसेच वाळलेल्या गवतांमधुन पोषक तत्व निघून जात असल्यामुळे दूध उत्पादन देणाऱ्या जनावरांना सकस आहार मिळत नसल्यामुळे दूध उत्पादन कमी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गवत हिरवे असतांनाच ते कापून ठेवून त्याचे गठ्ठे बनवून ठेवल्यास चाऱ्यामधील पोषक तत्व टिकून राहत असल्याने गवताचे गठ्ठे बनविणाऱ्या मशीन / यंत्रे चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यामध्ये उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास पशुसंवर्धन मंत्री यांच्याकडे लेखी स्वरूपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२२-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत मुरघास बेलर (गवताचे गठ्ठे तयार करण्याचे मशिन) यासाठी सन २०१९-२० मध्ये केंद्र शासनाकडून ५० टक्के केंद्र हिश्याचा प्राप्त निधी अर्थसंकल्पित नसल्यामुळे तो अखर्चित राहिलेला होता. सदर अखर्चित निधीस केंद्र शासनाची सन २०२१-२२ साठी पुनर्ग्राह्यता प्राप्त करून घेवून त्यापैकी सर्वसाधारण आणि अनुसूचित जाती प्रवर्गासाठी प्रत्येकी ०१ युनिट या प्रमाणे एकूण ०२ युनिट बुलढाणा जिल्ह्यात वाटप करण्यासाठी एकूण रू.२०.०० लक्ष ५० टक्के केंद्र हिश्याचा निधी माहे फेब्रुवारी व मार्च, २०२१ मध्ये वितरित करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिला व पुरुष होमगार्ड सैनिकांना कायदा व सुव्यवस्था बंदोबस्ताकरीता वंचित ठेवल्याबाबत**

**(४५) ३२३१९ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) होमगार्ड महासंचालनालयाच्या असंवेदनशील निर्णयाने वयाची ५० वर्षे पूर्ण करणाऱ्या महिला व पुरुष होमगार्ड सैनिकांना कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंदोबस्त देणेबाबतची मागणी प्रा.जगदेवराव बाहेकर, माजी जिल्हा समादेशक होमगार्ड, बुलढाणा यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांना दिनांक २६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (२०-१०-२०२१) :** (१) कोरोना रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्याने तसेच होमगार्ड चे पर्याप्त लसीकरण न झाल्यामुळे महासमादेशक, होमगार्ड यांनी ५० वर्षावरील होमगार्डना बंदोबस्तावर तैनात न करण्याबाबत निर्णय घेतला होता.
(२) हे खरे आहे.
(३) ५० वर्षावरील होमगार्डना बंदोबस्तावर तैनात करण्यात येत नव्हते. परंतू आता कोवीड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाला असल्याने ५० वर्षावरील ज्या होमगार्डचे लसीकरण पूर्ण झाले आहे. अशा होमगार्डना बंदोबस्तावर तैनात करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे अनाथ झालेल्या मुलांना**
**वात्सल्य योजना लागू करणेबाबत**

**(४६) ३२३२८ (०५-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाली असून अनेक मुलांनी आपले पालक या महामारीमुळे गमावले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कुटुंबातील लहान मुलांच्या डोक्यावरील छत्र हिरावल्यामूळे अशा अनाथ मुलांना सामाजिक दायित्व म्हणून शासनाने आधार देण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा अनाथ झालेल्या लहान मुलांना शासनाने “वात्सल्य योजने” अंतगर्त मोफत शिक्षण व वयाच्या १८ वर्षापर्यंत दरमहा पाच हजार रुपये आर्थिक मदत करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबातील अनाथ मुलांना “वात्सल्य योजने” अंतर्गत मोफत शिक्षण व आर्थिक मदत देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ मे, २०२१ रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२५-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे,
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
मा. विधानसभा सदस्य यांना शासनाच्या दि. २३.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कोविड -१९ संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या अनाथ बालकांसाठी शासनामार्फत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत अवगत करण्यात आले आहे.
(५) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय, क्र अनाथ २०२१/प्र.क्र.४९ /का.०३ दि. अन्वये मिशन वात्सल्य योजनेअंतर्गत कोविड-१९ मुळे एक वा दोन्ही पालक गमावलेल्या मुलांना शासनाच्या विविध विभागांच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तालुका व ग्राम पातळीवर समित्यांचे गठन करण्यात आले आहे.

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. अनाथ २०२१/प्र.क्र. ४९/का.०३ दि. १७.०६.२०२१ अन्वये, कोविड-१९ संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या अनाथ बालकांच्या नावे रु. ५ लक्ष इतक्या रक्कमेच्या मुदत ठेवीच्या स्वरुपात अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. तसेच या बालकांना बालसंगोपन योजनेंतर्गत दरमहा रु. ११००/- इतके अर्थ सहाय्य उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच महिला व बाल विकास विभाग व प्रोजेक्ट मुंबई ही स्वयंसेवी संस्था यांच्यामध्ये कोविड कालावधीत अनाथ झालेल्या बालकांची शैक्षणिक फी उपलब्ध करुन देण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लॉकडाऊन काळातील अनुज्ञप्ती शुल्क माफ केल्याबाबत**

**(४७) ३२३३६ (०४-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीच्या लॉकडाऊनच्या कालावधीत दारु विक्री बंद असल्याचे कारण दाखवून शासनाने दारू विक्रेत्यांचे अनुज्ञप्ती शुल्क माफ केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या महामारीमुळे अगोदरच शासनाची तिजोरी रिकामी झाली असतांना अनुज्ञप्ती शुल्क माफ केल्यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा निहाय किती शुल्क माफ करण्यात आले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (११-११-२०२१) :** (१), (२) व (३) राज्याच्या महसुली स्त्रोतांपैकी राज्य उत्पादन शुल्क हा एक महत्वाचा स्रोत आहे. सन २०२०-२१ या वर्षाकरिता राज्य उत्पादन शुल्कापोटी रु. १५,०७८ कोटी इतका महसूल राज्यास प्राप्त झाला आहे.कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर केंद्र शासनाने जाहीर केलेल्या लॉकडाऊनमुळे बाधित झालेल्या राज्यातील जनतेला आणि व्यावसायिकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने राज्य शासनामार्फत विविध विभागांच्या माध्यमातून विविध सवलती देण्यात आल्या आहेत. याच धर्तीवर, लॉकडाऊनमुळे बंद असलेल्या, प्रामुख्याने आदरातिथ्य व पर्यटन उद्योगाशी (Hospitality & Tourism) संबंधित असलेल्या व या क्षेत्राच्या व्यावसायिक पर्यावरणावर अवलंबून असलेल्या, राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत मद्यविक्री अनुज्ञप्ती धारकांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, अनुज्ञप्ती धारकांना दिलासा देण्यासाठी, अनुज्ञप्तींचा बंद कालावधी विचारात घेऊन त्यांच्याकडून आकारण्यात येत असलेल्या अनुज्ञप्ती नुतनीकरण शुल्कात दिनांक २४.१२.२०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये या विभागातर्फे खालीलप्रमाणे सवलत देण्यात आली आहे :-

अ) सन २०२०-२१ या वर्षासाठी सर्व प्रकारच्या अनुज्ञप्ती शुल्कात केलेली १५ टक्के वाढ मागे घेण्यात आली.
आ) सन २०२०-२१ करिता, नमुना एफ़एल-३ व नमुना एफएल-४ अनुज्ञप्त्यांसाठी अनुज्ञप्ती शुल्कात ५० टक्के आणि नमुना फॉर्म ई व फॉर्म ई २ या अनुज्ञप्त्यांसाठी अनुज्ञप्ती शुल्कात ३० टक्के सुट देण्यात आली. तसेच, ताडी विक्री अनुज्ञप्ती धारकांसाठी, सन २०२०-२१ या ताडी वर्षाकरिता गत वर्षाच्या तुलनेत करण्यात आलेली ६ % वाढ मागे घेण्यात आली असून दिनांक ०१.०९.२०२० ते ३१.०३.२०२१ या कालावधीसाठी, सन २०१९-२० या ताडी वर्षातील अनुज्ञप्ती शुल्काच्या प्रमाणात ३ महिन्यांचे अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यास मान्यता देण्यात आली.
वरील प्रमाणे सूट दिल्यामुळे अंदाजे रु. ३६१.०० कोटी इतकी तूट गृहीत धरण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता नेट, सेट सोबतच पीएचडी सुद्धा अनिवार्य करण्यात आल्याबाबत

**(४८) ३२३६० (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठे यामध्ये सुमारे १५ हजारांपेक्षा अधिक सहाय्यक प्राध्यापकांची पदे मागील सहा वर्षापासून रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्यात केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (युजीसी) अधिसूचनेनुसार दिनांक १ जुलै, २०२१ रोजीपासून विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक पदाकरीता नेट, सेट तसेच पीएचडी सुद्धा अनिर्वाय करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठात ५० टक्के सहाय्यक प्राध्यापकांची पदे रिक्त असताना नेट, सेट तसेच पीएचडी सुद्धा अनिर्वाय करण्यात येणे तसेच पदभरतीला मान्यता मिळत नसल्याने यासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) राज्य शासनाला वारंवार सहायक प्राध्यापकाची पदे भरण्याच्या सूचना करुनही शासनाकडून आर्थिक परिस्थितीचे कारण देऊन पदे भरण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, माहे जानेवारी, २०२१ मध्ये 'उच्च शिक्षण विभाग आपल्या दारी' या उपक्रमादरम्यान मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी राज्यातील सर्वच विद्यापीठांचा दौरा करुन प्राध्यापक भरती सरु करण्याचे आश्वासित केले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) शासन निर्णय दि.०३.११.२०१८ अन्वये रिक्त पदांच्या ४० टक्के प्रमाणे सहायक प्राध्यापक पदांची भरती करण्यास मंजूरी देण्यात आलेली होती. तसेच शासन निर्णय दि.०७.०८.२०१९ अन्वये सर्व अकृषि विद्यापीठातील मंजूर पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेत शिक्षकीय पदे भरण्यास मंजूरी देण्यात आलेली होती. तद्नुषंगाने भरती प्रक्रियेची कार्यवाही सुरू होती. तथापि, दरम्यानच्या काळात वित्त विभागाने त्यांच्या दि.०४.०५.२०२० च्या शासन निर्णयान्वये कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वित्तीय स्थितीसंदर्भात उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने पदभरतीवर निर्बंध आणले आहेत. तथापि, दि.०२.०९.२०२१ रोजी मा. उमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत पदभरतीबाबत वित्त विभागाने पदभरतीच्या प्रस्तावाबाबत नमूद केलेल्या मुद्यांची पूर्तता करून वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार यासंदर्भात सविस्तर प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण यांच्याकडून मागविण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पीक विम्याचा हप्ता ५,८०० कोटींचा असताना वितरण केवळ १००० कोटींचे झाले असल्याबाबत

**(४९) ३२३६८ (२३-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना राबविण्यात आली असुन पीक विम्यापोटी सुमारे ५,८०० कोटी रुपये कंपन्यांनी जमा केलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक विम्याचे निकष डावलण्यासाठी तहसीलदार आणि कृषि अधिकारी यांनी संगनमत करुन केवळ १००० कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना कालावधीचा फायदा घेऊन महसूल आणि कृषी अधिकारी यांच्या संगनमताने आणेवारी कमी असतानाही वाढ दाखवण्यात आल्याच्या सदर प्रकरणाची चौकशी करण्यासह राज्यातील पीक विमा कंपन्यांचे प्रतिनिधी, तहसिलदार, तालुका कृषि अधिकारी यांच्या मॅच फिक्सिंगची उच्चस्तरीय चौकशी होणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पीक विम्याची रक्कम देण्यास विलंब करणाऱ्या संबंधित विमा कंपन्याविरुध्द कारवाई करुन पीक विमा हप्तापोटी ५,८०० कोटींची कंपनीने जमा केलेली रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहे.

**श्री. दादाजी भुसे (१४-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

खरीप हंगाम २०२० मध्ये योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार एकूण १५.५५ लाख शेतकरी अर्जदारांना नुकसान भरपाई रक्कम रु. ९८०.६७ कोटी निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी ११.८२ लाख शेतकरी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रु. ७६८.४३ कोटी जमा करण्यात आली असून उर्वरित नुकसान भरपाई रक्कम रु. २०२.२४ कोटी वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

प्रधानमंत्री पीक विमा योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत नुकसान भरपाई निश्चित करतांना पैसेवारी, दुष्काळ, टंचाई परिस्थिती आणि पुरामुळे झालेल्या नुकसानी संदर्भात कोणत्याही शासकीय विभाग/संस्थेमार्फत घोषित करण्यात आलेली आकडेवारी ग्राह्य धरण्यात येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आयटीयन्सच्या समस्या सोडविण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीबाबत**

**(५०) ३२३८१ (१२-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः पिंपरी चिंचवड पुणे महानगरपालिका परिसरातील आयटी पार्क मधील अनेक तंत्रज्ञ इंजिनिअर व कुशल कामगारांना आयटी कंपन्यानी तीन महिन्याची नोटीस पिरियड घेऊन कामावरून कमी करण्यात आले आहे व आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञ इंजिनियर कुशल कामगार कमी करण्यात आल्याच्या तक्रारी फाईट फोरम फॉर आयटीएम्प्लॉईज या संघटनेने शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या प्रोफेशनल्स व कंपन्या यांच्यातील वाद व समस्या सोडविण्याकरिता तत्कालीन मुख्यमंत्री आणि कामगार मंत्री यांनी राज्यस्तरीय समिती गठीत केली असून मागील दीड वर्षापासून सदर राज्यस्तरीय आयटीयन्सच्या समस्यांसाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची एकही बैठक झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नोकरी सोडण्यापूर्वी ९० दिवसांची नोटीस देण्याची अट आयटी कंपन्यानी घातली. त्याविरोधात अनेक आयटीयन्स व त्यांच्या फाईट फोरम आयटी एम्प्लॉईज या संघटनेने तत्कालीन कामगार मंत्री यांच्याकडे निवेदन देऊन ९० दिवसांची नोटीस पॉलिसी रद्द करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आयटी कंपन्यांकडून ९० दिवसांची नोटीस देऊन नोकरी पिरियड बाबतची जाचक अट रद्द करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१३-१०-२०२१) :** (१) कोविड-१९ च्या काळात नाईट्स् (National Information Technology Employees Senate) व फाईट (Fourm For Information Technology Employee) या दोन संघटनांनी आयटी क्षेत्रातील कंपन्यानी कर्मचा-यांचे रजा धोरणाच्या संदर्भात, वेतन कपात, कर्मचा-यांना कामावरुन कमी केलेबाबतच्या तक्रारी कामगार उप आयुक्त, पुणे कार्यालयास ई-मेलव्दारे सादर केल्या होत्या. त्यानुषंगाने कामगार उप आयुक्त, पुणे कार्यालयाव्दारे संबंधित आस्थापनांना नोटीस पाठवून सदर तक्रारींचे निराकरण करण्याबाबत सुचित करण्यात आले होते. त्याअनुषंगाने व्यवस्थापनांनी सादर केलेल्या खुलाश्यामध्ये, कर्मचा-यांची वेतनवाढ, पदोन्नती नियतकालावधीमध्ये देण्यात येऊन रजा धोरणात कोणताही बदल करण्यात आलेला नसून कर्मचा-यांच्या वेतनात कपात करण्यात आलेली नसल्याचे तसेच, कर्मचा-यांना कामावरुन कमी करण्यात आले नसल्याचे कळविले आहे.

(२) आय.टी. क्षेत्रात काम करणा-या प्रोफेशनल्स व कंपन्या यांच्यातील वाद व समस्या सोडविणेकरीता राज्यस्तरीय समिती शासन निर्णय दि.०७.०३.२०२१९ अन्वये गठित करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि.११.०६.२०१९ रोजी घेण्यात आली आहे व पुढील बैठक दि.२३.०३.२०२० रोजी आयोजित करण्यात आली होती. तथापी कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर बैठक होऊ शकली नाही.

(३) अशा प्रकारचे निवेदन कामगार विभागास प्राप्त झालेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.